**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 6 | Feb 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *प्राचीन भारतीय संस्कृती व पर्यावरण रक्षण*

***सचितानंद शं.बिचेवार***

सहाय्यक प्राध्यापक,इतिहास श्री.पी.डी.जैन कला महा.अनसिंग
जि.वाशिम ( महा )

***सारांश :***

आज संपुर्ण मानवजातीला पर्यावरण संतुलनाची फारमोठी काळजी वाटू लागली आहे.त्या अनुषंगानेच पर्यावरण इतिहासाच्या अध्ययनालाही महत्व प्राप्त झाले आहे.भारतीय इतिहासकार व पर्यावरण वाद्यांना पर्यावरण इतिहासावर लेखन करण्याची स्फुर्ती देणारे ॲनाल्स विचार प्रणालीचे उद्‌गाते फर्नांद ब्रॉदेल यांच्या प्रेरणे पासूनच भारतातही पर्यावरणाचा इतिहास अभ्यासने सुरू झाले आहे.वास्तविक निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परांशी अगदी रक्ताच्या नात्यासारखे आहे. म्हणुन मानवाने प्रारंभापासुनच या निसर्गाविषयी, पर्यावरणा विषयी कृतज्ञ राहणाचा प्रयत्न केला आहे. त्यातुनच निसर्गाच्या सानिध्याचा, सहवासाचा योग्य लाभ घेवुन मानवाने आपले जीवन सुखी संपन्न बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

***प्रस्तावना :***

दुर्दैवाने मानवाच्या अतीमहत्वाकांक्षेने उचल खाल्यानंतर,विज्ञानाच्या अधिक संपर्कात आल्यानंतर याच मानवाने निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न सुरू केला.त्यातुनच पर्यावरणाचे संतुलन बिघडण्याचा प्रकार सुरू होऊन मानवी जीवन धोक्यात आणण्याचा इशारा निसर्गाने देण्यास प्रारंभ केला. त्यामुळेच आता खडबडुन जागा झालेला मानव पर्यावरण संवर्धनाची काळजी करू लागला आहे. भारतीय प्राचीन संस्कृतीने मात्र निसर्ग पूजा, पर्यावरण रक्षण हेच आपले खरे जीवन आहेहे धर्म किंवा ईश्वरसंकल्पनेच्या माध्यमातुन सांगण्याचा, जोपासण्याचा प्रयत्न केला होता. प्रस्तुत शोध निबंधामध्ये याच प्राचीन भारतीय निसर्गपूजा, पर्यावरण रक्षण आणि ईश्वर याबाबतचा आढावा घेतला आहे.

***हरप्पा संस्कृती व निसर्ग विषयक श्रद्धा :–***

भारतीय संस्कृती निसर्गावर प्रेम करणारी, मानवा प्रमाणेच इतर प्राणी,वनस्पती व नदया–डोंगरावर, यांच्या संरक्षण व उन्नतीसाठी कार्य करणारी संस्कृती म्हणून ओळखली जाते. याचे उत्तम उदाहरणे आपल्या प्राचीन हरप्पा, वैदिक संस्कृतीमध्ये पाहवयास मिळतात. जीवनावर प्रेम करणाऱ्या हरप्पा कालीन मानवाने निसर्ग सानिध्या प्रती कृतज्ञता व्यक्त केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत.विशेषतःपिपंळवृक्षाला या लोकांनी विशेष महत्व दिले आहे हे प्राप्त पुराव्यावरून लक्षात येते. पीपंळाच्या झाडा मध्ये मुख्य देवतेचा रहिवास असल्याची या लोकांची भावना होती. उत्पती आणि ज्ञानाचा हा वृक्ष मुख्य स्त्रोत आहे १ असे त्यावेळी मानले जात होते.

याच बरोबर बाभुळ सदृश्य वृक्षाच्याही आकृत्या काही शिक्यावर आढळतात. त्यावरून याही वृक्षाप्रतीची त्यांचीआत्मीयता प्रगट होते. एका शिक्यावर एक पूजारी बाभळी वृक्षास भेट देत असल्याचे चित्र अकित आहे, काही शिक्यावर बैल, नागदेवता वृक्षरक्षण करीत असल्याचे अंकीत आहे२.यावरून या संस्कृतीतील लोंकाचा वृक्षामध्येच देवतेचा रहिवास असल्याचा विश्वास दिसुन येतो३. निसर्ग सानिध्य आणि आपले जीवन याची उत्तम जाण देऊनच यांचे व्यवहार झाले असावेत हे त्यांच्या श्रद्धास्थान व विविध प्रतिमेवरून निदर्शनास येते. याच बरोबर प्राणीमात्रा विषयची विशेष प्रेमाची भावना विविध प्रतिमा दाखवून देतात. विशेष म्हणजे या काळातील

लोकांनी जलदेवता महत्वाची मानली होती. नदीला ते अत्यत पवित्र मानीत होते.४

### *वैदिक साहित्यातून प्रतीत होणारे निसर्ग प्रेम*

वैदिक संस्कृतीमधिल ईश्वर विषयक संकल्पना पाहिल्यास हे लक्षात येते की, निसर्ग शक्ती विषेयीची कृतज्ञता, भिती व आश्चर्य यातूनच निसर्ग शक्तीलात्यातील विविध घडामोडीनी आर्यानीं देवता मानल्याचे, त्याची आराधना केल्याचे ऋग्वेदातील ऋचेवरुन दिसते. याच बरोबर निसर्गातील ज्या प्राण्यानीं मानवाशी जूळवून घेतले किवां मानवाने त्यांना आपल्या बुध्दीचातुर्याने आपलेसे करुन घेतले अशा प्राण्यांना व ज्यांची भिती वाटत होती अशांनाही देखील आर्यानीं देवत्व देऊन त्याची पूजा केली.५उदाहरणार्थ गाय, बैल, घोडा, नाग, वाघ, सिंह इ. काही भूत - पिशाच्य कल्पनेतून देव उदयाला येऊन त्याचीही पूजा बांधल्याचे दिसते. उदा. पिपंळाच्या झाडावर भूत-पिशाच्य राहतात म्हणून, वडाच्या झाडाची तर यक्षाचा निवास झाडावर राहतो म्हणून त्याझाडाची व स्थळाची ईश्वर म्हणून पूजा केली जात होती. ६ नदी, पर्वत व निसर्गातील असंख्य घटक आपणास जगण्यासाठी किंवा मरण्यासाठी कारणीभूत ठरतात म्हणून त्याच्यांप्रती कृतज्ञता वा भय म्हणून त्यांची पूजा करण्याचा म्हणजेच त्यांच्या प्रती आत्मीयता ठेवण्याचा, त्यांचे संवर्धन करण्याचाच प्रयत्न या लोकांनी केलेला दिसून येतो.७

गीताकारांनी तर संसाराला अश्वत्थ वृक्षाची (वटवृक्ष) उपमा दिली असून वेदांना त्यांनी वृक्षाची पाने मानली आहेत.८ भगवान श्रीकृष्णही पीपंळ माझेच रुप आहे असे सांगुन त्यांची महती गातो. भारतीय संस्कृती मधील वटवृक्ष पूजा स्त्री अखंड सौभाग्यासाठी, जीवनाच्या दृढतेसाठी,पतीच्या वटवृक्षा एवढया दिर्घ आयुष्यासाठी,कुंटुंबाच्या स्थैऱ्यासाठी करीत आलेली आहे.९यामध्ये फार मोठा श्रध्देचा म्हणूनच पूज्यभाव असलेला दिसतो. त्याचे कारणही वृक्षा मध्ये असलेल्या दायीत्वामध्ये असल्याचे दिसून येते. उपनिषदाच्या मते निसर्ग म्हणजे जैवीक, भौतिक व रासायनिक सृष्टी होय. या सर्व सृष्टीचा मानवासी अगदी जवळचा संबध असल्या कारणाने या सर्वातील समन्वय अत्यंत महत्वाचा आहे. ऐतरिय उपनिषदामध्ये सृष्टीचा विकास सांगीतला आहे, तर माडुक्य उपनिषदा मध्ये वृक्षांना ईश्वर मानले आहे. बृहदारण्यक उपनिषदात वृक्ष एक मणुष्य असून त्याचे केस पाने असतात, त्वचा साल असते, साली खालुन रक्त (रस) वहातो, काष्ट मंजासंस्था आहे म्हणून वनस्पतीनां तोडणे उवनिषदामध्ये पाप मानले आहे.पूराणातील विष्णूचे विविध अवतार विविध प्राण्याच्या रुपात, दत्तात्रयाचे विविध गुरु विविध जीवात्म्याच्या, घटकांच्या संदर्भात दाखवून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या निसर्ग घटकांना जोपासण्याचा, देवत्वाच्या माध्यमातून त्यांची सेवा, संवर्धन करण्याचाच प्रयत्न प्राचीन वाङःमयात केल्याचे दिसुन येते. त्याच बरोबर विविध देवता आणि त्यांची आवडती, पूजेची वृक्ष पाहिली ,तर त्या मधुनही पर्यावरण संवर्धनाचाच अर्थ बाहेर येतो. उदा. तुलशी-विष्णू-लक्ष्मी,बेल-शिव, हरळी-गणेश पीपळ-बुध्द इ.डॉ ठवळीकराच्या मते, शांकभरी ही देवता वनस्पतीच्या सुफलनाची आधिष्ठात्री देवता होती. १० स्कंद पुराणात तीचे वर्णन धिन्नमस्ता असे केले आहे. देवी महात्म्यात दुष्काळ न पडण्यासाठी तीची पूजा केल्या जात होती. ११ असे उल्लेख आहेत. पूराणामध्ये दंडकारण्याचा उल्लेख पवित्र अरण्य असा केलेले आहे. १२ म्हणजेच उपनिपदे, पुराणे व इतर प्राचीन महात्म्य,साहित्य ईश्वर, निसर्ग आणि मानव यांचे परस्पर समन्वयाचे नाते त्यातुनच मानवाचे हीत जोपासना सांगत आल्याचे दिसून येते.

### *जैन व बुद्ध कालीन पर्यावरण संवर्धन दृष्टीः-*

चराचर सृष्टीची जोपासना भारतीय प्राचीन संस्कृतीने अत्यंत महत्वाची मानली होती. त्याचीच री पुढे जैनाच्या तत्वज्ञात, बुद्धाच्या इतिहासात पाहावयास मिळते. वर्धमानाची केवल्यज्ञानाची प्राप्ती होणारे ठिकाण शालवृक्ष.१३ तर गौतमाचे ज्ञान प्राप्तीचे ठिकाण पीपंळ वृक्ष१४ (बोधीवृक्ष) हे वृक्ष आणि ज्ञान,वृक्ष म्हणजे जीवन हेच सांगत आहेत. जैनाच्या व बुद्धाच्या तत्वज्ञानातील अखील सृष्टी विषयीची अहिंसा, करुणाहे निसर्गाप्रतीचे प्रेम, दया, पूजा व जोपासना म्हणजेच निसर्ग, पर्यावरण व मानव यांची योग्य सांगड घालण्याचाच तो अतीव प्रयत्न असलेल दिसतो.

### *सम्राट अशोक व उत्तर कालीन निसर्ग प्रेम*

त्यापूढील सम्राट अशोकाचा इतिहासही आपल्या विविध लेखातुन निसर्गातील विविध वनस्पती व प्राणीमात्रा बदल  आत्मीयता १५ दाखवून अप्रत्यक्षपणे निसर्ग व पर्यावरण संवर्धनाचेच धडे आपणास देतो. गुप्तकाळातील प्रसिध्द साहित्यिक कालीदास आपल्या रघुवंश या काव्यात शंकराने ज्याला आपला पूत्र मानले अशा देवदार वृक्षाला पार्वतीने जल सिंचन करून कसे वाढविले यांचे अत्यंत सुदंर वर्णन केले आहे १६ या मध्ये ही कालीदासाने  शंकर पार्वतीसह देवताही वृक्षाला दैवत मानत असुन त्यांची जोपासना करीत असल्याचे दाखविले आहे. शांकुतल व मेधदुतामध्ये मणुष्याच्या सुख-दुःखात पशु पक्षाप्रमाणेच लतावृक्षही सहानुभुती दाखवितात असे

कालीदास म्हणतो.१७

**.... *उपसंहार***

पर्यावरणाचा इतिहास अभ्यासण्याची आज विविध कारणामुळे आवध्यकता वाटत आहे. पाश्चात्य अभ्यासकांच्या पुढाकाराने पर्यावरणाचा, निसर्गाचा इतिहास अभ्यासून योग्य ती निसर्ग संवर्धनाची काळजी न घेतल्यास मानवजातीचा विनाश अटळ असल्याचे संकेत अभ्यासक देतांना दिसून येतात. परंतु प्राचीन भारतीय इतिहास संस्कृतीचा अभ्यास केला तर अगदी हरप्पा संस्कृती काळापासुनच मानवाने निसर्गातील अपकारक व उपकारक सर्व जैव, भौतिक रासायनीक बाबीना दैवत मानुन त्याची जोपासना करण्याचा अत्यंत महत्वाचा प्रयत्न केला होता. म्हणुनच त्यांचे जीवन आजच्या काळाच्या तुलनेत सुखी आणि समाधानी असल्याचा इतिहास सांगतो. विविध पर्वत, शिखरे, समुद्र, आकाश वायु सूर्य यांचा या काळातील उद्रक त्यातून महापूर, त्सुनामी,भूकंप, विविध रोग या सारखी विध्वंसक अशी निसर्ग कृत्य ही निश्चीतच पर्यावरण हासाची घोतक असल्याचे अभ्यासक मानत आहेत. म्हणूनच निसर्ग रक्षण, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे.प्राचीन संस्कृतीने आम्हास शिकवूनही आपण त्यापासून योग्य बोध घेण्यास तयार नाही. आज पर्यावरण तज्ञ आपणास जे सांगतात ते प्राचीन काळातील आपल्या पूर्वजांनी अगोदरच सांगितले आहे त्यांची प्रेरणा म्हणूनच आपणसाठी अत्यंत महत्वाची आहे.

***संदर्भ व टिपा :–***


*(1) महाजन वी. डी., प्राचीन भारत का इतिहास, एस. चंद्र ॲण्ड कंपनी प्रकाशन, दिल्ली, पृ. 58*
*(2) कित्ता पृ.59*
*(3) सदार पु.श्री., सिंधु घाटी सभ्यता का इतिहास, मूलनिवासी पब्लेकेशन टुस्ट, पूणे 2011, पृ. 146*
*(4) कित्ता*
*(5) अहिरराव प्र.रा.,भारतीय मूर्तिपूजेचा इतिहास, वरदा बुक्स, पूणे 1996 पृ 5–6*
*(6) कित्ता*
*(7) विघालंकार सत्यकेतू, प्राचीन भारत का इतिहास वैदिक युग, सरस्वती सदन, दिल्ली, 2005 पृ 260*
*(8) प्रभुवाद भक्तीवेदांतस्वामी, भगवतगीता, भक्तीवेदांत बुक ट्रस्ट, मूंबई, 2007 पृ 505*
*(9) आठवले पाडुरंग शास्त्री, संस्कृती पूजन (संकलन), सहविचार दर्शन , मुंबई पृ210–11*
*(10)ढवळीकर एम.के, शांकभरीः दि हेडलेस गॉडेस, ऑफ दि भांडारकर ओरीएण्टल रिसर्च इन्स्टिटयुशन, पूणे 1987 पृ 291–93*
*(11)पाठक अरुणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेरिअर : इतिहास प्राचिन काळ, दर्शविला विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, 2002 पृ 652*
*(12) कित्ता*
*(13) महाजन वी.डी., उपरोक्त, पृ 146*
*(14) कित्ता, पृ 159*
*(15) आपटे वा.गो, सम्राट अशोक चरित्र, वरदा प्रकाशन, पुणे, 2002 पृ 72 – 73*
*(16) मिराशी वा.वि., कालिदास, म.रा. साहित्या आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1999 पृ 131*
*(17)कित्ता, पृ. 243*